
आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । बुधवार, ३ फेब्रुवारी २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : १५ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## श्रीराम मंदिरासाठी ६०० कोटींचा निधी संकलित



अयोध्या : अयोध्येत राम जन्मभूमी येथे श्रराम मंदिर नव्याने उभारण्यासाठी मोठा निधी संकलित होत आहे. आतापर्यंत श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या खात्यात जवळपास सहाशे कोटींचा निधी संकलित झाला आहे. यातील १०० कोटींपेक्षा जास्त रक्कम थेट चेकद्वारे देण्यात आली आहे. मकर संक्रांतीपासून राम मंदिरासाठी निधी संकलन सुरू आहे. विश्व हिंदू परिषद निधी संकलन करत आहे. निधी संकलन २७ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.

# 'गडकरी भेट' विकासकामांसाठीच!

## आमदार प्रकाश सोळंके यांची माहिती; कामचुकारांना वठणीवर आणण्यासाठी 'हक्कभंग'

प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव मतदारसंघातील दोन राष्ट्रीय महामार्गाचे अर्धवट स्थितीत आहे. विविध विकास कामांसंदर्भात आपण नवी दिल्लीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली. दरम्यान, प्रसारमाध्यमांतून गडकरी भेटींबाबत ज्या बातम्या आल्या त्या निरर्थक असल्याचा दावाही या पत्रकार परिषदेत आमदार प्रकाश सोळंके यांनी केला.

आमदार प्रकाश सोळंके यांच्या निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेला मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, राष्ट्रवादीचे नेते जयदत्त नरवडे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, कामचुकार अधिकारी, कर्मचाऱ्यांमुळे मतदारसंघातील विकासकामांना खीळ बसली आहे. अशा कामचुकारांना वठणीवर आणण्यासाठी हक्कभंग प्रस्ताव आणणार आहे. मागील ५ वर्षात मतदारसंघात विविध योजना राबविण्यातच आल्या नाहीत. अनेक खात्यांमधील शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत. १९८६ पासूनची भूसंपादनाची १६ हजार २४२ प्रकरणे प्रलंबित आहेत. यात जमीन मावेजा, रेल्वे मावेजा, गाव तलाव मावेजा, आदींचा समावेश आहे. ही सर्व प्रकरणे त्वरित मार्गी लावण्यासाठी तीन भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्यासाठी मंत्रालय पातळीवर प्रयत्न केले जाणार आहेत, अशीही माहिती सोळंके यांनी दिली. माजलगाव मतदारसंघासाठी ५६८ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. प्रत्यक्ष कामांना प्रारंभ एप्रिल महिन्यात होईल.



### गडकरींनी 'त्या' आमदारांची यादी जाहीर करावी

केंद्रीय मंत्री तथा भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी २०१८ साली कमिशन मागणाऱ्या आमदार-खासदारांची तक्रार केली होती. हे प्रकरण आपण आमदार होण्यापूर्वीचे आहे. विकासकामांना गती मिळण्यासाठी गडकरींची भेट घेतली. तरीही जनतेच्या शंकांचे निरसन होण्यासाठी 'त्या' आमदार-खासदारांची यादी जाहीर करावी, अशीही मागणी आमदार प्रकाश सोळंके यांनी केली.

### एमआयडीसी सबस्टेशन उभारणार

एम.आय.डी.सी. बाबत बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, एमआयडीसी सबस्टेशन उभारण्यासाठी शासन पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. एमआयडीसी मधील २० प्लॉट विक्री झाले आहेत, असेही सोळंके यांनी सांगितले.

## शाम देशमुख यांचा वाढदिवस 'बालग्राम'मध्ये



माजलगाव : सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक श्याम देशमुख यांनी आपला वाढदिवस 'बालग्राम'मध्ये मुलांसमवेत साजरा केला. देशमुख यांनी मुलांसाठी अल्पोपहार आणि अभ्यासासाठी आधुनिक एलईडी बल्ब, ट्यूब लाईट वितरीत केल्या.

## स्नेहभाव जपणारी डक यांची हुरडा पार्टी

प्रतिनिधी

माजलगाव : येथील डक परिवाराने गेली २६ वर्षे अखंडीत हुरडा पार्टी आयोजित करून स्नेहभाव जपण्याचे काम केले आहे. समाजातील डॉक्टर्स, वकिल, पत्रकारांसह घटकांनी हुरडा पार्टीचा आस्वाद घेतला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक हे गेली २६ वर्षे आपल्या शेतात हुरडा पार्टी आयोजित करतात. अखंडीतपणे हुरडा पार्टी आयोजित करून विविध घटकांना या माध्यमातून लुप्त होत चाललेल्या हुरडा पार्टीचा आस्वाद दिला. हुरडा पार्टीच्या माध्यमातून डक परिवार स्नेहभाव जपण्याचे काम करत आहे. कृषी संस्कृती सानिध्यात स्नेहभोजन करून आपुलकी वृध्दीसाठी डक परिवार आगळ्या वेगळ्या हुरडा पार्टीचे आयोजन करते. यंदा माजलगावा तील पत्रकारांनी स्नेह भोजनाचा आनंद घेतला.



## निर्मळ ज्वेलर्सचा महाराष्ट्रभर नावलौकिक व्हावा : आमदार प्रकाश सोळंके

प्रतिनिधी



माजलगाव : निर्मळ ज्वेलर्सचा महाराष्ट्रभर नावलौकिक व्हावा, अशा शब्दांत आमदार प्रकाश सोळंके यांनी गौरवोद्गार काढले. ते निर्मळ ज्वेलर्स आयोजित विविध बक्षीस योजनांच्या सोडत कार्यक्रमात बोलत होते.यावेळी धारूरचे माजी नगराध्यक्ष माधव निर्मळ, जि.प.सभापती कल्याण आबुज यांनी मनोगत व्यक्त करून निर्मळ ज्वेलर्सचा वाटचालीबाबत माहिती दिली. या कार्यक्रमाला जि.प.सदस्य चंद्रकांत शेजुळ, जयदत्त नरवडे, सतिष सोळंके, आण्णासाहेब वगरे, नगरसेवक भागवत भोसले, अशोक आळणे, राहुल लंगडे, विजय शिंदे, बाळु ताकट आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक माधव निर्मळ यांनी केले, तसेच सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी तर आभार कल्याण आबुज यांनी मानले.



विजेत्यांना बक्षीस वाशिंग मशीनचे वितरण करताना निर्मळ ज्वेलर्सचे मालक माधव निर्मळ, कल्याण आबुज, बाळू ताकट, रंजित रूपनर, संपादक भगीरथ तोडकरी आदी.

### सतिष सोळंके स्कुटीचे मानकरी

निर्मळ ज्वेलर्सने आयोजित केलेल्या विविध योजनांच्या सोडतीचे बक्षीस यावेळी जाहीर केले. गंगामसला येथील सतिष सोळंके यांना स्कुटी, बीड येथील डॉ.महेश क्षीरसागर यांना एईडी टिव्ही, तर अमरदीप शिंदे यांना वाशिंग मशीन हे बक्षीस प्राप्त झाले. विजेत्यांचे माधव निर्मळ, कल्याण आबुज यांनी अभिनंदन केले.




# चंद्रकांत शेजुळ एक अष्टपैलू व्यक्तीमत्व

**माजलगाव : सामाजिक, राजकीय आणि सहकार अशा विविध क्षेत्रात आजमितीला चंद्रकांत शेजुळ हे अग्रेसर नाव आहे. तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर करण्यात करण्यात चंद्रकांत शेजुळ यांची अपार मेहनत आहे. गोरगरीब, दुःखितांच्या हाकेला धावून जाणारे चंद्रकांत शेजुळ हे अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणून नावारूपास येत आहे. ३ फेब्रुवारी हा शेजुळ यांचा वाढदिवस त्यानिमित्ताने त्यांच्या व्यक्तीमत्वावर प्रकाशझोत.**



निमित्त

**भगीरथ तोडकरी**

माजलगावस्थित तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचा वैभवशाली डोलारा फुलविण्यात चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांचा हातखंडा राहिला आहे. तुळजाभवानी अर्बन म्हणजे चंद्रकांत शेजुळ असे जणू समीकरण झाले आहे. सहकार क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करून राजकीय पटलावरही चंद्रकांत शेजुळ सक्रीय झाले आहेत. आमदार प्रकाश सोळंके यांचे विश्वासू सहकारी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतही त्यांनी अल्पावधीत वेगळे स्थान निर्माण केले आहे. मिनी मंत्रालय अर्थात जिल्हा परिषदेतही त्यांनी वेगळा ठसा उमटविला आहे.

प्रतिष्ठेच्या पात्रुड जिल्हा परिषद सर्कलमधून तत्कालीन आमदार आर.टी.देशमुख यांचे चिरंजीव रोहित देशमुख यांचा पराभव करून शेजुळ जिल्हा परिषदेची पायरी चढले. आज त्यांच्याकडे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालकपद आहे. कोणत्याही पदाला न्याय दिला पाहिजे, या हेतूने चंद्रकांत शेजुळ कार्यरत असतात. सहकार, राजकीय क्षेत्राबरोबरच उद्योग, शेतीमध्येही त्यांनी वेगवेगळे प्रयोग करून आपले अष्टपैलू व्यक्तीमत्व सिध्द केले आहे. तुळजाभवानी अर्बन आज राज्यातील काही काही बोटावर मोजण्याइतपत मल्टीस्टेटमध्ये अव्वल आहे. तुळजाभवानीने राबवलेले उपक्रम जनसामान्यांच्या कल्याणासाठी उपयुक्त ठरलेले आहेत. अंडरग्राऊंड लॉकर सिस्टीम कार्यान्वीत करणारी तुळजाभवानी अर्बन राज्यातील पहिली मल्टीस्टेट ठरली आहे. या नव्या अफलातून प्रयोगाचे चंद्रकांत शेजुळ हे जनक ठरले आहेत. दुष्काळात शेतकऱ्यांच्या मदतीला चंद्रकांत शेजुळ धावून गेलेले आहेत.

माजलगाव तहसिल कार्यालयास वॉटर फिल्टर, सामुदायिक विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी भरीव मदत, कोरोना मुख्यमंत्री सहाय्यता निधी ला तब्बल ११ लाख रुपयांचा निधी, लॉकडाऊन काळात पोलिस कर्मचाऱ्यांना अन्नदान, असे एक नव्हे अनेक उपक्रम राबविण्यात चंद्रकांत शेजुळ यांची सामाजिक बांधिलकी असते. प्रत्येक घटकांसाठी आपण काहीतरी देणे लागतो, याच भावनेतून चंद्रकांत शेजुळ सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असतात. नुकताच तुळजाभवानी अर्बनचा वर्धापनदिन मोफत आरोग्य व उपचार शिबिर घेवून साजरा करण्यात आला. शेतकरी, शेतमजुरांच्या मुलांना तुळजाभवानी अर्बन समुहात नोकरी देवून शेजुळ यांनी सामाजिक दायित्व स्वीकारले आहे. यासाठी त्यांचा विविध पुरस्कार देवून वेळोवेळी सन्मान झालेला आहे.



चंद्रकांत शेजुळ

### आबेगावचा सर्वांगीण विकास करणार

घार फिरे आकाशी, चित्त तिचे पिलेपाशी या ओळींप्रमाणे चंद्रकांत शेजुळ यांचे आहे. आज त्यांचा महाराष्ट्रभर नावलौकिक झाला असला तरी जन्मगाव आबेगाव बद्दल त्यांची मोठी आत्मीयता दिसते. आबेगाव शाळेसाठी भरीव निधी आणून विकास केला. यानंतरही आबेगावचा सर्वागीण विकास साधण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही 'वर्तमान'शी बोलताना चंद्रकांत शेजुळ यांनी दिली.

## संपादकीय

# अर्थव्यवस्थेची घडी बसतेय...

कोरोनाच्या लाटेनंतरही भारतीय अर्थव्यवस्था घडी बसताना दिसत आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची शक्यता आता जवळपास मावळली आहे. कोरोनाचे लसीकरण सुरू झाले आहे. ३१ जानेवारीनंतर देशातले निर्बंध पूर्णत: शिथिल होण्याची शक्यता आहे. अर्थव्यवस्थेवर या सर्व घटकांचा अनुकूल परिणाम व्हायला लागला आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. अर्थव्यवस्था आता पूर्वपदावर यायला लागल्याचे संकेत वेगवेगळ्या घटनांमधून मिळायला लागले आहेत. नव्या वर्षाची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला चांगली बातमी देऊन गेली. वस्तू व सेवा कराचं संकलन कधी नव्हे, एवढं झालं. डिसेंबरमध्ये एक लाख १५ हजार कोटी रुपये मिळाले. गेल्या वर्षी कोरोनाची साथ सुरू झाल्यानंतर एप्रिलमध्ये जीएसटीचं करसंकलन अवघं ३५ हजार कोटी रुपये झालं होतं. त्या तुलनेत डिसेंबरचं संकलन तिपटीहून अधिक झालं. अर्थव्यवस्था पूर्वपदावर यायला लागल्याचं हे लक्षण आहे. अनलॉक प्रक्रिया जसजशी पुढे जाईल, तसतशी अर्थव्यवस्थेची गती वाढत जाईल. रिझर्व्ह बँकेसह वेगवेगळ्या वित्तीय संस्थांनी अर्थव्यवस्थेत अपेक्षेपेक्षा जास्त गतीनं सुधारणा होत असल्याचं मत गेल्याच महिन्यात मांडलं आहे. एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षाचा भारताचा आर्थिक विकास दर आठ टक्के असेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. भारतात एकदम दोन लसींना मान्यता मिळाली आहे. कोरोनाचं लसीकरण सुरू होत आहे. त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होत आहे. ही गती अशीच राहिली, तर जानेवारीपासूनचं जीएसटी संकलन सव्वालाख कोटी रुपये होईल, असा अंदाज आहे. प्रत्येकाचा असा विश्वास आहे की, जानेवारी ते मार्च २०२१ दरम्यान जीडीपी वाढ सकारात्मक होईल. जीएसटी संकलनानं कोरोनापूर्व पातळी ओलांडली असली तरी अजून वाढ होण्याची शक्यता आहे. देशभरातले आर्थिक निर्बंध अद्याप पूर्णपणे उठलेले नाहीत. काही भागांत निर्बंध आहेत. लसीकरण सुरू झाल्यामुळे प्रत्येक महिन्याचं जीएसटी संकलन १.२५ लाख कोटी रुपयांवर जाईल. परिस्थिती सुधारली, तर त्याचा परिणाम करवसुलीवर होईल. व्यवसाय वाढला, तर करसंकलन जास्त होतं. करसंकलन डिजिटल पद्धतीनं होत असल्यानं कर चुकवणं कमी झालं आहे. डिसेंबरमध्ये जीएसटी संकलन विक्रमी पातळीवर पोहोचण्यामागे हेदेखील एक कारण आहे. एव्हाना अर्थव्यवस्थेतल्या घडामोडींना गती आली आहे. चौथ्या तिमाहीत देशाची अर्थव्यवस्था (जीडीपी) वाढ सकारात्मक राहील. त्यानंतर जोरदार पुनर्प्राप्ती दिसून येईल. जुलै २०१७ पासून देशात जीएसटी लागू झाल्यानंतरचं हे सर्वात मोठं करसंकलन आहे. यापूर्वीचा विक्रम एक लाख १४ हजार कोटी रुपयांच्या संकलनाचा आहे. तो एप्रिल २०१९ मध्ये झाला होता. जीएसटी चुकवणं आणि बनावट बिलांच्या विरोधात देशभरात करण्यात आलेल्या मोहिमेमुळे संकलनही वाढलं आहे. कोरोनाची परिस्थिती पूर्णपणे सामान्य झाली नसताना जीएसटी संकलनाचा हा विक्रम झाला आहे. एकीकडे जीएसटीचं संकलन वाढल्याचं निष्पन्न होत असताना वीज वापरातही वाढ झाल्याची आकडेवारी जाहीर झाली. सरकारी आकडेवारीनुसार डिसेंबर २०२० मध्ये विजेचा वापर ६.१ टक्के वाढला. या कालावधीत विजेचा वापर ११०.७ अब्ज युनिट (बीयू) झाला आहे. या आकडेवारीवरून असं दिसून येतं की, देशातली आर्थिक प्रक्रिया निरंतर सुधारत आहे. आकडेवारीनुसार, डिसेंबर २०१९ मध्ये विजेचा वापर १०१.०८ अब्ज युनिट होता. मार्चपासून सप्टेंबरपर्यंत विजेची मागणी कमी होती. सप्टेंबरमध्ये महिन्यांच्या घटानंतर, विजेच्या वापरामध्ये वार्षिक आधारावर ४.५ टक्के वाढ नोंदली गेली. विजेच्या वापरामध्ये ऑक्टोबरमध्ये ११.६ टक्के वाढ झाली. तथापि, नोव्हेंबरमध्ये थोडीशी घसरण झाली असून ती ३.१२ टक्के झाली. या महिन्यात, विजेचा वापर ९६.८८ अब्ज युनिट होता. तज्ज्ञांच्या मते, येत्या काही महिन्यांमध्ये वीज मागणीतली वाढ स्थिर राहील. कोरोनामुळे व्यावसायिक उलाढाल थांबली. त्यामुळे विजेचा वापरही कमी होऊ लागला. एकीकडे आर्थिक पातळीवर चांगल्या घडामोडी घडत असताना जागतिक पातळीवरची गुंतवणूक वाढत गेली. भारताच्या इक्विटी बाजारामध्ये परकीय गुंतवणूकदारांचा (एफआयआय) सकारात्मक प्रवाह या वर्षीही कायम राहण्याची अपेक्षा आहे. परदेशी गुंतवणूकदारांनी नोव्हेंबरमध्ये ६० हजार ३५८ कोटी आणि डिसेंबरमध्ये ६२ हजार १६ कोटींची गुंतवणूक केली आहे. २०२० मध्ये एफआयआयने एक लाख सत्तर हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली. २०१९ मध्ये इक्विटी बाजारात एकूण १ लाख एक हजार १२२ कोटींची गुंतवणूक झाली होती. गुंतवणूकदारांनी २०२० मध्ये भांडवली बाजारातून एक लाख चार हजार कोटी रुपये काढले असले तरी डिसेंबरमध्ये हा आकडा सकारात्मक होता आणि सुमारे ५००० कोटींची गुंतवणूक झाली आहे. कॉर्पोरेट कंपन्यांच्या तिमाही कामगिरीचे निकाल लवकरच येतील. हे निकाल अपेक्षेपेक्षा चांगले असतील. कंपन्यांची कामगिरी चांगली होते तेव्हा परदेशी गुंतवणूकदारही गुंतवणूक वाढवतात. आताही सर्व निदर्शक चांगले असल्यामुळे परदेशी गुंतवणूक वाढेल. सप्टेंबरच्या तिमाहीत कंपन्यांचा नफा दीड लाख कोटींपेक्षा जास्त झाला आहे. वीज, पेट्रोल आणि डिझेलचा वापर कोरोनाच्या पहिल्या स्तरावर पोहोचला आहे. काही शहरांमध्ये घरांची मागणी वाढली आहे. रिअल इस्टेट क्षेत्राला सात वर्षानंतर चांगले दिवस आले आहेत. डिसेंबर २०२०मध्ये देशात डिझेलची विक्री कोरोनापूर्व काळाच्या ९७ टक्के पातळीपर्यंत आली आहे. डिझेल वापरामध्ये स्थिर वाढ म्हणजे देशाची अर्थव्यवस्था हळूहळू पूर्वपदावर येत आहे. डिझेल हा आर्थिक स्थितीचा एक प्रमुख मापदंड मानला जातो. ऑक्टोबर २०२० मध्ये डिझेलची विक्री कोविडपूर्व पातळीवर गेली आणि वर्षाच्या तुलनेत सहा टक्क्यांनी वाढली. दुसरीकडे पेट्रोलची विक्री वाढण्याचा ट्रेंड आहे. पेट्रोल विक्रीवाढीचा कल कायम आहे. डिसेंबरमध्ये पेट्रोलची विक्री वर्षाच्या तुलनेत ७.७ टक्क्यांनी वाढली आहे. एकीकडे ही स्थिती असताना निर्यातीत सलग तिसऱ्या महिन्यांत घट झाली. डिसेंबर २०२० मध्ये निर्यात ०.८ टक्क्यांनी घसरून २६.८९ अब्ज डॉलरवर आली. सरकारी आकडेवारीनुसार पेट्रोलियम, चामडे आणि सागरी उत्पादनांच्या निर्यातीत घट झाल्यामुळे एकूण निर्यात कमी झाली आहे. विशेष म्हणजे वस्त्रोद्योग आणि चामड्याच्या क्षेत्रात अधिक रोजगार असलेल्या कंपन्यांमध्ये १५ टक्क्यांपेक्षा कमी घट झाली आहे.

# केंद्राच्या धोरणामुळे गुंतवणूकदार थंडावले

**कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची झळ फारशी बसली नसली तरी कोरोनामुळे भारताचं आर्थिक नुकसान जास्त झालंय. यंदाच्या बजेटमधे काय उपाययोजना हव्यात याविषयी अनेक तज्ञ लोक आपलं मत मांडतायत. यात भारतीय रिजर्व बँकेचे माजी गवर्नर रघुराम राजन यांचं म्हणणंही महत्त्वाचं ठरणारं आहे. एनडीटीवीला दिलेल्या त्यांच्या मुलाखतीचं निखील घाणेकर यांनी केलेलं हे शब्दांकन.**

**अर्थकारण**

**रघुराम राजन**

जगातल्या अनेक देशांना कोरोना वायरसच्या दुसऱ्या लाटेची झळ बसलीय. अमेरिकेत सत्तांतर झाल्यामुळे जगभरातलं वातावरण बदलतंय. अशावेळी जगातल्या सगळ्याच देशांसमोर आर्थिक स्थैर्य राखण्याचं आव्हान आहे. या स्थितीत कोरिया, चीन यासारख्या देशांनी वायरसचा संसर्ग नियंत्रणात ठेऊन काही प्रमाणात आर्थिक स्थैर्य राखण्यात यश मिळवलंय.



भारताला मात्र कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची झळ जगातल्या इतर देशांपेक्षा कमी बसली. आपल्याकडे ऍक्टिव पेशंट आणि मृत्यूच्या प्रमाणातही घट होताना दिसतेय. लोकांचे दैनंदिन व्यवहार आणि दळणवळण पूर्वपदावर येतंय. सर्व काही लवकरच सुरळीत होईल असा विश्वास लोकांना वाटतोय. आर्थिक स्तरावर भारतातली परिस्थिती समाधानकारक आहे. संपूर्ण देशातलं चित्र मात्र कोड्यात टाकणारं आहे. एका बाजूला उच्च मध्यमवर्गाला कोरोना साथीची कोणतीही झळ बसलेली दिसत नाही. त्यांच्या क्रयशक्तीवर कोणताही परिणाम झालेला दिसत नाही. याउलट देशामधे बेरोजगारीचं प्रमाण पूर्वीपेक्षा वाढताना दिसतंय. आज १८ मिलियन लोक बेरोजगार आहेत.

बँकिग क्षेत्रात सुविधा आवश्यक

आज भारताने कोरोना वायरसच्या दुसऱ्या लाटेचा प्रतिबंध आणि लसीकरणाचा वेग वाढवायला प्राधान्य देण्याची गरज आहे. पंतप्रधान गरीब कल्याण योजनेला चालना द्यायला हवी. तसंच सरकारने पायाभूत सुविधांसाठी अधिक खर्च करायला हवा. यासाठी राज्यांना आर्थिक मदत द्यायला हवी. सोबतच बँकांना भांडवली बळ देणं आणि त्यांच्यावरच्या नियंत्रणात सुधारणा करणं आवश्यक आहे. यावर्षीचा अर्थसंकल्प मांडताना काही अल्पकालीन उपाय आणि काही दीर्घकालीन उपाय या सरकारने करायला हवेत. पायाभूत सुविधा, गृहउद्योग यांना चालना द्यायला हवी. ज्या लोकांना पैशाची सर्वाधिक आवश्यकता आहे अशा लोकांच्या हाती पैसा द्यावा. सध्याच्या काळात अर्थव्यवस्था केवळ गतिमान करायला प्राधान्य देणं पुरेसं नाही तर सर्व स्तरातल्या लोकांना सोबत घेऊन या कठीण काळात त्यांना तग धरायला मदत करणं, दिलासा देणं आवश्यक आहे.

प्रक्रिया रचनात्मक हवी

आजच्या अर्थव्यवस्थेत खासगी गुंतवणुकीची उणीव आहे. यासाठी जर काही प्रमाणात बाजारपेठेत निश्चिती आली तर व्यवसाय आणि उद्योगांसाठी सकारात्मक चित्र उभं राहील. खाजगी, परकीय उद्योग आणि परकीय गुंतवणूकदार यांना देशातल्या वातावरणाबद्दल सकारात्मकता का वाटत नाही याचा विचार व्हायला हवा. आजच्या घडीला सरकार एका ध्येयाच्या दिशेने प्रयत्न करताना दिसत असलं तरीही त्याबाबत काय योजना आहे, रचना काय याबद्दलचं चित्र अस्पष्ट आहे. आपण परकीय गुंतवणूकदारांना आवाहन करतो आणि देशी उद्योगांना फायदा व्हावा म्हणून काही नियम बदलतो. यामुळे चुकीचा संदेश जातो. आज उद्योगांना निश्चिती हवीय. सध्याच्या परिस्थितीत सर्वच उद्योग गुंतवणूकीची रचना किमान फायदा तत्वावर करतात. त्यांच्यावर करांचे आणि इतर निर्बंध, नियंत्रण असलं तरी चालेल पण उद्योगांना यात निश्चिती हवी आहे. अचानक गुंतवणूकीतल्या कोणत्याही घटकाच्या किंमती बदलल्या तर संपूर्ण नियोजन कोलमडू शकतं. धोरणातल्या या अस्थिरतेची भीती गुंतवणूकदारांना वाटत असावी ही भीती दूर करण्यासाठी रचनात्मक प्रक्रियेची आवश्यकता आहे.

आकड्यांची लपवाछपवी

कोरोना साथीच्या काळात जगभर चीनची प्रतिमा बदलली, याचा फायदा भारताला होईल आणि अनेक परदेशी कंपन्या भारतात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतील. भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबुती येईल असं चित्र निर्माण करण्यात आलंय. काही प्रमाणात असं झालं असलं तरी बहुतांश प्रमाणात तसं न होता उद्योगांनी भारताऐवजी विएतनाम, बांगलादेश यांसारख्या देशांना पसंती दिल्याचं दिसतंय. असं का होतंय याचा विचार सरकारने करण्याची गरज आहेरोजगाराची संधी निर्माण झाली आणि निर्यातीला चालना मिळाली तर अर्थव्यवस्थेला बळकटी मिळू शकते. कोरोना नंतरच्या काळात बाजारात मोठ्या प्रमाणात अनिश्चितता आहे, त्याचा परिणाम म्हणजे खासगी गुंतवणुकीत घट झालेली दिसतेय. आज अनेक उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. कोणतंही सरकार लोकांसमोर जे आकडे ठेवतं त्यावर आपला विश्वास बसत नाही याचं कारण सरकार कुणाचंही असलं तरीही सत्य परिस्थिती लपवण्यासाठी आकड्यांची लपवाछपवी आणि त्यात सोयीनुसार आणि दिखाव्यापुरते बदल करणं आपल्याकडे पूर्वापार चालत आलंय. पण यामधे पारदर्शकता आली आपल्याला उचल घेणं शक्य होऊ शकतं. दाखवलेले आकडे आणि सरकारची वागणूक यात बदल असला तर गुंतवणूकदारांचा विश्वास बसत नाही.

तरुणाई आपली जमेची बाजू

आपल्याकडे तरुण लोकसंख्या अधिक असून त्यात अनेक तरुणांमधे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्याची आणि अनेक क्षेत्रात जगाचं नेतृत्व करण्याची क्षमता आहे. कोणताही व्यवसाय किंवा उद्योग हा शहरातूनच करावा लागतो असा एक समज होता पण साथीच्या काळात या समजुतीला छेद देण्यात आलाय. आता 'बिझनेस फ्रॉम एनीवेयर' शक्य आहे असं दिसतंय. आकाराने मोठ्या असलेल्या भारतासारख्या देशाला या बदलत्या दृष्टिकोनाचा फायदा करून घेता आला पाहिजे. कोरोना नंतरच्या काळात आपल्याला आर्थिक पुनरुज्जीवन करायचं असेल तर पायाभूत सुविधांवरचा खर्च वाढवणं, बँकांना भांडवली बळ देणं, विकेंद्री पद्धतीने धोरण निश्चित करणं, शाळा पूर्वीसारख्या पूर्ण क्षमतेने सुरू करुन शैक्षणिक नुकसान रोखणं आवश्यक आहे.

# दुसऱ्याच्या आयुष्यात डोकावणारं वाटस्ॲप

**वॉट्सॲपची प्रायवसी पॉलिसी बदलल्यापासून ते वापरावं की नाही याविषयी मतंमतांतरं दिसू लागलीयत. आपल्या मोबाईलच्या विंडोमधून वाकून पाहिल्यानंतर मिळणारी आपली माहिती वॉट्सॲप फेसबुक आणि इतरांना शेअर करणार आहे. त्यामुळेच, अनेकजण वॉट्सॲपला पर्याय म्हणून दुसऱ्या ॲपचा विचार करतायत. पण ही ॲप तरी वापरायला सुरक्षित आहेत का?**

**आज-काल**

**रेणुका कल्पना**

त्यामुळे क्रश हो' म्हणाली म्हणून जल्लोष व्यक्त करणारं वॉट्सॲपचं हेडक्वार्टर हा जोक म्हणून मस्त असला तरी अतिशोयोक्तीच आहे. ही माहिती फक्त पोलिसांना गुन्हाच्या तपासासाठी वगैरे दिली जाते. पण त्याबाबतचं कोणतंही स्पष्ट धोरण वॉट्सॲपच्या कोणत्याही पॉलिसीत दिलं नाहीय.

नवीन प्रायवसी पॉलिसीत आहे काय?

नव्या प्रायवसी पॉलिसीत एण्ड टू एण्ड एन्क्रिप्शन तसंच राहणार आहे. फक्त मेटा डेटा कुणाला शेअर करणार याबद्दलची पॉलिसी बदलणार आहे. ही नवी पॉलिसी आपल्या अकाऊंटला लागू करण्यासाठी आपली परवानगी मागणारं नोटिफिकेशन वॉट्सॲपने अनेकांना दिलं. परवानगी द्या' किंवा आत्ता नको' असे दोनच पर्याय इथं उपलब्ध होते. ८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत ही परनवागनी दिली नाही तर तुमचं वॉट्सॲप अकाऊंट डिलीट होईल. या नव्या प्रायवसी पॉलिसीत वॉट्सॲप फेसबुकला आणि इन्स्टाग्रामसारख्या फेसबुकच्या इतर कंपन्यांनाही युजरचा सगळा डेटा देईल, असं स्पष्टपणे लिहिण्यात आलंय. वॉट्सॲप लिहितं, फेसबुक कंपनीचा भाग असल्याने वॉट्सॲपला इतर फेसबुक कंपन्यांकडून माहिती मिळते आणि ते ती इतरांना शेअरही करतं. आम्हाला त्यांच्याकडून मिळालेली माहिती आम्ही वापरू आणि आमच्याकडून मिळालेली माहिती ते वापरतील.'



अमेरिकेतही जाईल आपला डेटा

हा डेटा म्हणजे नेमकं काय असेल? तर युजरचा मोबाईल नंबर, पत्ता, देश, शहर, वय, आयपी ऍड्रेस, युजरच्या कॉण्टॅक्टमधे किती आणि कोण माणसं आहेत त्याची माहिती, त्यांचा कॉण्टॅक्ट नंबर, त्यांचे पत्ते इतकंच नाही, तर युजरच्या मोबाईलची बॅटरी लेवल, सिग्नल स्ट्रेन्थ, भाषा, इंटरनेट कोणत्या कंपनीचं वापरतोय अशी बरीचशी माहिती. म्हणजेच, मेटा डेटा. वॉट्सॲप पे वापरुन पैसे ट्रान्सफर करणाऱ्यांचीही काही खासगी माहिती वॉट्सॲपकडे साठवली जाईल. वॉट्सॲपचं मुख्य ऑफिस आहे अमेरिकेत. हा सगळा डेटा साठवणारं केंद्रही मुख्य ऑफिसमधेच आहे. त्यामुळे गरज पडली तर युजरची खासगी माहिती तिकडे पाठवली जाऊ शकते असंही वॉट्सॲपने सांगितलंय. फक्त अमेरिकेतच नाही तर इतर देशांतल्या फेसबुकच्या, इन्स्टाग्रामच्या ऑफिसमधेही ही माहिती पाठवली जाईल.

वॉट्सॲपचं स्पष्टीकरण

या प्रायवसी पॉलिसीवरून भारतातून फेसबुकवर भरपूर टीका झाली. या टीकेचा रोख इतका जास्त होता की फेसबुकला त्यावर स्पष्टीकरण जाहीर करावं लागलं. या पॉलिसी अपडेटनं मित्र, मैत्रिणी आणि नातेवाईकांसोबत केलेल्या चॅटवर कोणताही परिणाम होणार नाही. उलट हा अपडेट वॉट्सॲप बिझनेस अकाऊंट वापरणाऱ्या लोकांपुरताच मर्यादित असणार आहे, असं स्पष्टीकरण वॉट्सॲपने दिलं. पण बिझनेस अकाऊंट वापरणाऱ्या लोकांसाठी अपडेट असेल तर सरसकट सगळ्यांना तो मान्य करण्याची सक्ती का केली गेली या प्रश्नाचं वॉट्सॲपच्या स्पष्टीकरणातून मिळत नाही. वॉट्सॲपने बिझनेस अकाऊंटची सोय सुरू केलीय. बँकांपासून ते कोणत्याही व्यावसायिक कारणासाठी हे बिझनेस अकाऊंट उघडता येतं. अकाऊंट बिझनेसचं असलं तरी त्याचे ग्राहक मात्र सामान्य माणसं असणार. तेही लाखोंच्या संख्येनं असणार. हे हजारो ग्राहक साधी अकाऊंट वापरत असले तरी बिझनेस अकाऊंटच्या संपर्कात असल्याने त्यांचाही डेटा वॉट्सॲपला मिळवता येईल,' अशी माहिती ओपनसोर्स टेक्नॉलॉजीत आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारे प्रशिक्षक प्रसाद शिरगावकर यांनी सांगितलं.

पॉलिसीतला नेमका बदल

पॉलिसी बदलली याचा अर्थ आपला डेटा फेब्रुवारीपासून वॉट्सॲपकडे जाईल असं नाही. हा डेटा या आधीही फेसबुककडे जात होताच,' असं शिरगावकर पुढे सांगतात. आपल्या फोनमधे नवीन नंबर सेव केला आणि त्या माणसाशी वॉट्सॲपवर चॅट केलं की लगेचच त्याचं नाव फेसबुकला पिपल यू मे नो'मधे येतं. यावरून आपला मेगा डेटा फेसबुककडे जात होताच हे स्पष्ट होतं. पॉलिसीतला बदल एवढाच की आधी हा डेटा फेसबुकला द्यायचा की नाही हे ठरवण्याची मोकळीक युजरला होती. माझा डेटा फेसबुकसोबत शेअर करू नका असा एक पर्याय आपल्याला दिला होता. आता त्यांनी फेसबुकसोबत डेटा शेअर करणार असून ते स्वीकारलं तरच तुम्हाला वॉट्सॲप वापरता येईल असं सांगितलंय.' असं ते पुढे म्हणाले.

या सगळ्या डेटाचं काय होतं?

या सगळ्या डेटाचा वापर हा फक्त आणि फक्त एकाच कारणासाठी होईल. ते कारण म्हणजे, पैसे कमावणं. वॉट्सॲप वापण्यासाठी आपल्याला पैसे मोजावे लागत नाहीत. मग या कंपन्या आपला डेटा विकून, त्या डेटावर जहिरातदारांना आकर्षित करून पैसे कमवतात. म्हणजे, आपण वॉट्सॲपवर गिटारबद्दल कुणाशी बोललो तर आपल्याला फेसबुकवर लगेचच गिटारच्या जहिराती दिसू लागतील. त्या जहिरातींचे पैसे फेसबुक कंपनीला मिळणार असतात. म्हणून त्यांना आपला डेटा हवा असतो. यासोबतच वॉट्सॲपने हा डेटा थर्ड पार्टीलाही देणार असल्याचं सांगितलंय. थर्ड पार्टी अत्यंत विवादीत आणि कमी माहिती असणारा मुद्दा आहे. यात बुक माय शोसारख्या कंपन्या असू शकतात. वॉट्सॲपवर ते तिकिटं पाठवतात आणि फेसबुकवर जहिरात करतात. त्यांना ही माहिती शेअर केली जाते. आता ही थर्डी पार्टी बुक माय शोसारखी कंपन्यांपुरती मर्यादित असेल तर ते ठिक. पण आपल्या राजकीय, भावनिक, समाजमन घडवण्याऱ्या गोष्टींबद्दल ते केलं जाऊ लागेल तर त्याला चूकच म्हणावं लागेल. एका विशिष्ट राजकीय विचारधारा भारतातल्या लोकांच्या मनात रुजावी यासाठी या माहितीचा वापर केला तर त्यातून आपल्या देशाच्या सार्वभौमत्वावरही गदा येऊ शकते.

पर्यायी ॲपची सुरक्षितता

फक्त वॉट्सॲपच्या बदललेल्या प्रायवसी पॉलिसीमुळे अचानकच आपल्या खासगीपणावर गदा आलीय असं नाहीय. ती आधीपासूनच येत होती. वॉट्सॲपचं जाऊ दे. पण फेसबुकचं ॲप आपण वापरत असू तर आपला डेटा थेट फेसबुकला देण्याचं आपण मान्य केलेलंच असतं. हे दोन्ही ॲप वापरत नसू तरी गुगलकडे आपला केवढा डेटा असतो हे सांगणंही कठीण आहे. वॉट्सॲपला पर्याय म्हणून लोक सिग्नल, टेलिग्रामचा विचार करतायत. त्यातल्या त्यात सिग्नल आत्ता सुरक्षित ॲप आहे, असं म्हणता येईल. वॉट्सॲप आणि सिग्नल दोन्ही एकच सुरक्षा व्यवस्था वापरतात. पण सिग्नलचा मेटा डेटाही इन्क्रिप्टेड असतो. कारण, सिग्नल ही कंपनी नफा कमवाण्यासाठी काम करत नाही, म्हणून त्यांना हे शक्य होतं,' अशी माहिती समीर आठल्ये यांनी दिली.

आमचा डेटा खुशाल घ्या!

सिग्नल असो वा वॉट्सॲप आज आपली डिजीटल प्रायवसी जपणं फार कठीण झालंय. या खिडकीतून वाकून पाहणाऱ्या ॲपचं करायचं काय असा प्रश्न पुढच्या काळात फार जटील होत जाणार आहे. अनेकदा तुमची खिडकीच बंद करून घ्या असा एक सल्ला दिला जातो. ॲपच नाही तर संपूर्ण मोबाईलचा वापरच बंद करा असा त्याचा अर्थ होईल. आजच्या जगात अँड्रॉईड फोनचा वापर बंद करणं शक्य नाही हे उघड आहे. म्हणूनच कॉन्शिअस डेटा शेअरिंग सारख्या संकल्पना पुढे येतायत. हॅकिंग हॅपिनेस या आपल्या पुस्तकात ही संकल्पना समजावून देताना तत्त्वचिंतक जॉन हेवन्स आमचा डेटा खुशाल वापरा असं सांगतात. फक्त तुम्ही कोणता डेटा वापरताय ते आम्हाला सांगा. इतकंच नाही, तर हा डेटा विकल्याने तुम्ही पैसेही कमवा. पण त्यातले थोडे पैसे आम्हालाही द्या. हे पैसे फारच तुटपुंजे असले तरी हरकत नाही. पण आमच्या डेटावरती कमावलेल्या पैशातल्या काही भाग तरी आम्हाला मिळेल, असं हेवन्स यांचं म्हणणं आहे.

टीका केली ते बरंच झालं

वॉट्सॲपने बदलेली प्रायवसी पॉलिसी युरोपियन क्षेत्रांच्या बाहेर राहत असू तरच लागू होणार आहे. युरोपियन देशांसाठी वॉट्सॲपने वेगळी प्रायवसी पॉलिसी आखलीय. ही पॉलिसी त्यांच्या खासगीपणाचं जास्तीत जास्त रक्षण करणारी आहे. मग भारतातच अशी पॉलिसी का याचं उत्तर देताना प्रसाद शिरगावकर म्हणाले, युरोपियन आपल्या खासगीपणाबद्दल जास्त सतर्क असतात. त्यामुळेच युरोपियन युनियनने तिथे जनरल डेटा प्रोटेक्शन रेग्युलेशन म्हणजेच जीडीपीआर नावाचा एक कायदा केलाय. या कायद्यामुळे युजरची खासगी माहिती वॉट्सॲपला कुणालाही शेअर करता येत नाही.' भारतात डेटा प्रोटेक्शन कायदा आणणारं बील गेली दोन ते तीन वर्ष संसदेत पडून आहे.

नागरिकांनाच आपलं खासगीपण महत्त्वाचं वाटत नसल्याने त्यांचं प्रतिनिधित्व करणारी नेते मंडळीही या बिलाकडे फारसं लक्ष देत नाहीत. पण युरोपियन देशांप्रमाणे भारतातही लवकरात लवकर डेटा प्रोटेक्शन कायदा आणावा लागेल. वॉट्सॲपची प्रायवसी पॉलिसी बदलल्यावर भारतीय लोकांनी केलेली टीका, घातलेला गोंधळ या दृष्टीने चांगलाच म्हणावा लागेल. भारतात कायदा नसला तरी तिथल्या लोकांना गंडवता येणार नाही हे वॉट्सॲपला उलगडलंय. म्हणूनच तर काल १५ जानेवारीला त्यांनी या प्रायवसीची अंतिम तारीख पुढे ढकलणार असल्याचं जाहीर केलंय. आता ८ फेब्रुवारी ऐजवी १५ मेपर्यंत या अपडेटला मान्यता न देता वॉट्सॲप वापरता येईल. आपली तात्पुरती सोय झाली असली खिडकीतून वाकून पाहणाऱ्या वॉट्सॲपची कायमची सोय आणायची असेल तर लवकरात लवकर डेटा प्रोटेक्शन कायदा आणावा लागेल.

(समाप्त)

# सेंद्रिय शेतीशिवाय शेतकऱ्यांना पर्याय नाही

## धैर्यशील सोळंके यांचे प्रतिपादन ;श्री स्वामी समर्थ कृषी महोत्सव समारोप

प्रतिनिधी



तेलगाव : श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग दिंडोरी, तथा अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक आयोजित २२ ते ३० जानेवारी जागतिक कृषी महोत्सव समारोप येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना येथे करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा कारखान्याचे चेअरमन धैर्यशील सोळंके यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती शिवाय पर्याय नाही, शेतकऱ्यांना अध्यात्मिक, शास्त्रोक्त, सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम श्री स्वामी समर्थ सेवा मार्गातून परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे दिंडोरी तून करत आहेत.

या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व श्री स्वामी समर्थ महाराजांचे पूजन करून झाले. उदघाटक म्हणून भागवत बप्पा देशमुख तर व्यासपीठावर प्रा.ईश्वर मुंडे, प्रमुख वक्ते अरुण देशमुख, कृषी भूषण प्रल्हाद गवारे, धारुर पंचायत समितीचे सभापती हनुमंत नागरगोजे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अण्णासाहेब जगताप, प्रल्हाद गवारे, अरुण देशमुख (ऊस तज्ञ) यांनी मार्गदर्शन केले. या कृषी महोत्सवात सेंद्रिय





खत, धान्य, कडधान्ये, वनौषधी, स्वयंरोजगार, शेती औजारे, मराठी संस्कृती,मराठी अस्मिता, सणवार उत्सव मांडणी यांचे विविध स्टॉल लावलेले होते. पंचक्रोशीतील महिला-पुरुष शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## 'स्वराष्ट्र'कडून रूग्णाला मदतीचा हात



माजलगाव : स्वराष्ट्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर मेंडके यांच्या कार्यालयात प्रभाग ३ येथील रहिवासी उध्दव माने यांना यशवंत हॉस्पिटलमध्ये उपचारसाठी या रूग्णाला ब्लडची कमतरता भासल्यामुळे त्यांना ब्लड कार्ड देताना युवासेना तालुकाप्रमुख बाळासाहेब मेंडके, नारायण मेंडके, संतोष गायकवाड आदी.

# माजलगावचा सराफ बाजार आता मंगळवारी राहणार बंद

प्रतिनिधी

माजलगाव : येथील सराफ असोसिएशन सेवा संघच्या वतीने बैठक घेवून सर्वानुमते दर मंगळवार रोजी साप्ताहिक सुट्टी पाळण्याचा ठराव घेण्यात आल्याची माहिती सराफ संघटनेचे अध्यक्ष रामराजे रांजवण यांनी दिली.

सराफ सेवा संघाची दि.२६ जानेवारी रोजी बैठक होवून या बैठकीत दर मंगळवारी सराफा बाजार बंद ठेवून साप्ताहिक सुट्टी पाळण्याचा ठराव सर्व सभासदांच्या समक्ष व सर्वाच्या साक्षीने मंजुर करण्यात आल्याची माहिती असोशियशनचे अध्यक्ष रामराजे रांजवण, सचिव गजानन बोकन यांनी दिली.

या बैठकीवेळी सराफ व्यापाऱ्यांच्या इतर प्रश्नांवरही सखोल चर्चा करण्यात आली. राज्यस्तरीय संघटनेच्या मार्गदर्शनाखाली हे प्रश्न शासन दरबारी मांडण्याचे निश्चित झाले. तसेच साप्ताहिक सुट्टीबाबतचा निर्णय सर्वांनी कटाक्षाने पाळण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले.

# खुर्शीद नाईक यांना मातृशोक

प्रतिनिधी



माजलगाव : येथील माजी नगरसेवक खुर्शीद नाईक यांना मातृशोक झाला असून त्यांच्या मातोश्री कुलसुमबी याकुब नाईक यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी शनिवारी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात माजी नगरसेवक खुर्शीद नाईक, महमूद नाईक, इब्राहिम नाईक, लतीफ नाईक, अतिक नाईक, रफिक नाईक ही सहा मुले व दोन मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

# घरफोडीचा अवघ्या ३ दिवसांत लावला छडा

प्रतिनिधी

माजलगाव : येथील तहसील कार्यालयातून बदली होऊन परळी येथे गेलेले कलीम जैनोद्दीन सय्यद यांच्या घरी दि.२४ रोजी घरफोडीची घटना घडली होती. यात नगदी रक्कमेसह घरातील वस्तू चोरीला गेल्या. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत अवघ्या तीनच दिवसांत आरोपींना ताब्यात घेत मुद्देमालही जप्त केला.

कलीम जैनोद्दीन सय्यद हे परळी येथील तहसील कार्यालयात कार्यरत असल्याने त्यांना दररोज परळी या ठिकाणी जावे लागत होते तसेच त्यांच्या घरात कोणी नाही ही संधी साधून ताब्यात घेतलेले आरोपी सोहेल इलियास इनामदार (वय २५ वर्ष) आणि सय्यद तौफिक गफ्फार (वय ३६ वर्ष) यांनी घरातील रोख रक्कमेसह इतर वस्तूंवर डल्ला मारला. दिवसा ही घरफोडी झाल्याने पोलिसही चक्रावून गेले होते. परंतु तपासी अधिकारी व्ही. एस.थोटे यांनी शिताफीने प्रकरणाचा तपास केला. पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनात गोपनीय माहितीतून समोर आलेल्या संशयितांवर बारीक नजर ठेवून दिनांक २७ रोजी रात्री सव्वादहा वाजता येथील बागवान गल्ली येथून आरोपीना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चोरी गेलेल्या



रकमेपैकी नगदी रोख ६२ हजार, दोन पाण्याच्या इलेक्ट्रिक मोटार, एक फॅन, चांदीचे चैन, फिर्यादीचे आधार कार्ड, पॅनकार्ड, एटीएम एलईडी टीव्ही आदी माल जप्त केला. सदरील आरोपी हे शेजारीच राहत होते त्यामुळे घरात काय काय आहे याची इत्यंभूत माहिती त्यांना होती व चोरी गेलेल्या वस्तूंचे स्वरूप पाहता चोरटे हे जवळचेच असल्याबाबत पोलिसांना शंका होती व ती खरी देखील ठरली. या गुन्ह्याच्या तपास कमी तपासी अधिकारी व्ही.एस.थोटे, पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, अविनाश राठोड, जयराम भटकर यांनी अत्यंत शिताफीने कामगिरी बजावली.

# उत्कृष्ठ कर्मचाऱ्यांमुळे वखार महामंडळ प्रगती पथावर : राजकुमार भिसे

प्रतिनिधी

माजलगाव : गुणवत्तापुर्ण व उत्कृष्ठ कर्मचाऱ्यांमुळेच वखार महामंडळ प्रतीपथावर असल्याचे प्रतीपादन वखार महामंडळाचे औरंगाबाद विभागाचे उपमहाव्यवस्थापक आर.एस.भिसे यांनी शनिवारी माजलगाव येथे सेवानिवृत्त साठा अधिक्षक चंद्रकांत टाक यांच्या सेवापुर्ती सोहळ्यात बोलतांना केले.

फुलेपिंपळगाव शिवारात असलेल्या वखार महामंडळ कार्यालयातील साठा अधिक्षक चंद्रकांत सखाराम टाक हे शनिवारी वखार महामंडळात पस्तीस वर्षाची सेवापुर्ती करुन सेवानिवृत्त झाले. त्यांना वखार महामंडळ कार्यालय माजलगाव तर्फे आयोजित सेवापुर्ती सोहळ्यात निरोप देण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन परळी साठा अधिक्षक एच.आर.कुरेशी, लोखंडे, एस.के.सवाई, प्रिया कंदाडे, माणिकराव फड, बीड जिल्हा राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेशराव टाक, आनंदराव कुलथे,



दिपक शहाणे, संचालक राजाभाऊ दहीवाळ, पी.एस.आय. भास्कर कांबळे, महावीर कोटेचा आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना भिसे म्हणाले की कर्मचारी जर गुणवत्तापुर्ण असतील तर प्रगती झपाट्याने होते. त्यातील टाक हे पाच वेळा गुणवत्ता पारितोषिक मिळवणारे कर्मचारी आहेत. त्यांना निरोप देतांना माझ्यासह सर्वच कर्मचारी भावनिक झाले आसून महामंडळाच्या नियमाधिन ते या पुढेही महामंडळाची सेवा करु शकतात असे ते म्हणाले. यावेळी सर्व कर्मचारी वृंदाच्या वतीने टाक यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला. कार्यकामाचे सुत्रसंचलन प्रा.बबनराव उदावंत यांनी केले. यावेळी माथाडी कामगार उपस्थित होते.

# जि.प.ऊर्दू माध्यम शाळेच्या आदर्श मुख्याध्यापकांचा सन्मान

प्रतिनिधी

माजलगाव : शहरापासून जवळच असलेल्या केसापुरी वसाहत जिल्हा परिषद ऊर्दू माध्यमाचे आदर्श मुख्याध्यापक शे. इसराईल पटेल यांच्या कार्याची दखल घेऊन गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने प.स.उपसभापती डॉ.वसिम मनसबदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

केसापुरी वसाहत येथील जिल्हा परिषद उर्दू माध्यमाची शाळा गेले कित्यक वर्षापासून ही शाळा पाटबंधारे विभागच्या जागेत एका खोलीत भरवली जाते. २०१९ साली या शाळेचा विद्यार्थी पट २१ होता परंतु मुख्याध्यापक शे.इसराईल पटेल यांनी कर्तव्यात अतिशय मेहनत घेत आज विद्यार्थी पट ७५ केला असून एका खोलीत विद्यार्थीची अडचण दुर करण्यासाठी त्यांनी जामिया हुसेनिया वेल्फेअर सोसायटी ट्रस्टच्या मालकीची विनामुल्य तीन खोल्या उपलब्ध करून त्या खोल्यात शाळा स्थंलातरीत केल आहे.




# निष्ठावंत नेतृत्व वाल्मिक कराड



परळी नगर परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते तथा वाल्मिक कराड हे राज्याचे सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे अतिशय विश्वासू सहकारी आहेत. निष्ठावंत नेतृत्व असलेल्या वाल्मिक कराड यांचे कसे आहे व्यक्तीमत्व यावर प्रकाशझोत टाकणारा विशेष लेख वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.




रथाचा सारथी हुशार आणि चालाख असेल तर हरलेले युध्दही जिंकता येते, आपले ध्येय अल्पावधीत यशस्वीरित्या गाठता येते. हा इतिहास आहे. महाभारतातही श्रीकृष्णाने अर्जुनाचे सारथ्य केले म्हणून पांडव विजयी झाले तर सात्यकी या सारथ्याने कर्णाचे खच्चीकरण केले म्हणुन त्याचा पराभव झाला. सांगायचे एवढेच की सहकारी जीवाचे आणि कोणत्याही प्रसंगात साथ देणारे असतील तर माणुस हमखास यशस्वी होतो. शेकडो झिलकऱ्यांपेक्षा जीवाला जीव देणारे मोजकेच सहकारी असावेत असे अध्यात्म आणि इतिहास सांगतो. केवळ आणि केवळ कृष्णाच्या सारथ्य कलेमुळे अर्जुनाचा अनेकदा प्राण वाचला. कृष्ण, सुदामा, रामभक्त हनुमान अशा ऐतिहासिक एकनिष्ठ भक्त, मित्र अशा सर्वच व्याख्येत तंतोतंत बसणारे व्यक्तीमत्व म्हणजे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांचे जिवश्च - कंठश्च स्नेही, सहकारी, सखा, कार्यकर्ता असे नगर परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते वाल्मीक अण्णा कराड... पडद्यामागचे खरेखुरे सुत्रधार म्हणजे वाल्मीक अण्णा... पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या यशामागे वाल्मीक अण्णा यांचा सहभाग अतिशय म्हणजे अतिशय महत्त्वाचा आहे. धनंजय यांच्या परस्पर प्रत्येक कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन वाल्मीक अण्णा यशस्वीरित्या पार पाडतात.ना.धनंजय मुंडे यांच्या राजकारणातील उद्यापासून ते आजतागायत वाल्मीक अण्णा अगदी सावलीसारखे सोबत आहेत. सावली तरी अंधारात साथ सोडते पण वाल्मीक अण्णांनी कोणत्याही प्रसंगात ना.धनंजय यांची साथ सोडली नाही. निष्ठा कशी असावी तर वाल्मीक अण्णासारखीच असावी. सध्याच्या स्वार्थासाठी निष्ठा गहाण ठेवली जाणाऱ्या जमान्यात निष्ठेचे मुर्तीमंत उदाहरण म्हणून वाल्मीक अण्णा कराड यांच्याकडे बघितले जाते. विशेष म्हणजे काही तरी मिळेल या आशेने नाही तर आपण कुणाला तरी काही तरी देऊ या उदात्त भावणेने त्यांची निष्ठा आहे. बेईमान लोकांच्या गोतावळ्यात कुणावर कसा विश्वास ठेवावा असा प्रश्न पडत असताना ज्याच्या खांद्यावर डोकं ठेऊन बिनधास्त राहावे असा विश्वासाचा खांदा म्हणजे वाल्मीक अण्णा...आपल्या संगठन आणि कल्पकतेची चुणूक वाल्मीक अण्णा यांनी युतीच्या काळात दाखवून दिली. ना.धनंजय मुंडे यांनी राजकारणात सक्रिय होण्यासाठी जिल्ह्यात एक रथयात्रा काढली होती. तिचे अतिशय नेटके आणि सुरेख नियोजन वाल्मीक अण्णा यांनी केले होते. संपूर्ण बीड जिल्ह्यातील विविध भागात जाऊन ना.धनंजय मुंडे यांनी जनतेशी संवाद साधला होता. तेंव्हाच त्यांचा राजकारणात प्रवेश झाला

**विशेष**

**मोहन साखरे**

आणि नेपथ्य अर्थातच वाल्मीक अण्णा यांच्या हती. तेंव्हापासून वाल्मीक अण्णांनी नेपथ्यावर कायम प्रभूत्व ठेवले आहे. स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे, स्व. पंडितअण्णा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांच्या राजकारणाची अघोषित जबाबदारी वाल्मीकअणांकडे सोपवली. जिकीरीचे आणि जोखमीचे काम असले की साहेब आणि अण्णा दोघांची पसंती असायची ती वाल्मीक कराड... या विश्वासाला वाल्मीक अण्णांनीही कधीच तडा जाऊ दिला नाही. वाट्टेल ती किंमत मोजून किंवा कोणताही त्याग करून नाही जमेल तो मार्ग वापरून वाल्मीक कणांनी सोपवलेले काम यशस्वी केले. दगडालाही टाक्याचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही तसेच इथपर्यंत येण्यासाठी वाल्मीक अण्णांनीही आनेक घाव सहन केले आहेत. नव्हे प्रसंगी स्वतः चा जीवही धोक्यात घातला आहे. विशेष म्हणजे अनेकांनी त्यांच्या चहाड्या - चुगल्या करून वाल्मीक अण्णांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. त्यात बऱ्याचजणांना काही प्रमाणात यश आल्यासारखे वाटायचे पण थोड्याच दिवसात सत्य समोर यायचे आणि वाल्मीक अण्णा पुन्हा आपल्या स्थानावर भक्कम असायचे. त्यांच्यावर वहिनी (प्रज्ञाताई) आणि बाई (रूक्मीणबाई) यांचा विशेष विश्वास होता. त्यातही बाईंचा अधिक जीव होता आणि सध्याही आहे. ना.धनंजय मुंडे कुठेही जात असतील तर वाल्मीक सोबत आहे ना याची खात्री पटल्याशिवाय बाई स्वस्थ बसत नसत.ना.धनंजय मुंडे यांनी कोणताही कार्यक्रम हाती घेतला की तो यशस्वी करण्यासाठी वाल्मीक अण्णा जीवतोडून प्रयत्न करायचे. ना.धनंजय मुंडे यांच्या राजकारणाच्या सुरूवातीला लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या सभांचे नियोजन त्यांच्याकडे असायचे तेंव्हाही वाल्मीक अण्णा एखाद्या इव्हेंट मॅनेजरला लाजवेल असे नियोजन करायचे आणि आता पडद्यामागचे सर्वात यशस्वी कलाकार म्हणुनच त्यांना ओळखले जाऊ लागले आहे. सहकाऱ्यांसाठी त्याग करावा तो त्यांनीच! आपल्याला काही तरी मिळावे म्हणून नाही आपल्या सहकाऱ्यांना न्याय आणि सन्मान मिळावा यासाठी ते सतत काम करीत असतात. सुरुवातीला क्रिकेट स्पर्धा आणि नंतर सामुदायिक विवाह सोहळा हे दोन्ही यशस्वी करण्यात वाल्मीक अण्णांचा सिंहाचा वाटा... विशेष म्हणजे केलेल्या कामाचे श्रेय त्यांनी कधीच घेतले नाही. पण केलेले काम झाकत नाही हेही तितकेच सत्य आहे. गणेशोत्सवाचे औचित्य साधून धनंजय मुंडे यांनी पुण्याच्या धर्तीवर परळी फेस्टिव्हल सुरू केला आणि आपले नेपथ्य दाखवण्याची संधी पुन्हा एकदा वाल्मीक अण्णांना मिळाली. खरे तर खुद्द मुंडे साहेब आणि पंडितअण्णा या दोघांच्या तालमीत वाल्मीक अण्णांचं व्यक्तीमत्व अगदी ताऊन सुलाखून निघाले आहे. त्यामुळेच त्यांचे नेतृत्व आपण जपले पाहिजे. नेतृत्वशी एक निष्ठ कसे असे याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे वाल्मिक अण्णा या शुभदिनी अण्णा आपणांस उदंड आयुष्य लाभो ही प्रार्थना!




आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**